# ※ संघराज्य प्रदेश ※

→ घटनेच्या कलम १ मध्ये- भारतीय क्षेत्रात समावेश.

→ संघराज्य प्रदेश → केंद्र सरकारच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली व प्रशासनाखाली
(राज्ये केंद्राबरोबर अधिकार वाटून घेतात)

## ※ संघराज्य प्रदेशांची निर्मिती ※

⇒ ब्रिटिश राजवटीच्या काळात १८७४ मध्ये काही अनुसूचित जिल्हे म्हणून स्थापन.
⇒ नंतर त्यांना मुख्य आयुक्तांचे प्रांत म्हणून संबोधण्यात आले.
⇒ स्वातंत्र्यानंतर राज्यांच्या भाग सी व डी- वर्गवारीत समावेश.
⇒ १९५६ -सातवा घ.दु. कायदा आणि १९५६- राज्य पुनर्रचना कायदा-नुसार संघराज्य प्र. स्थापना.

सध्याची ७ केंद्रशासीत/संघराज्य प्रदेश व स्थापना वर्ष.

① अंदमान आणि निकोबार- १९५६
② लक्षद्वीप १९५६
③ दिल्ली १९५६
④ दादरा आणि नगर हवेली १९६१
⑤ दमन आणि दिव- १९६२
⑥ पुदुच्चेरी १९६२
⑦ चंडीगढ १९६६

→ सन १९७३ पर्यंत- लक्षद्वीप —— लॅकॉदिव, मिनिकॉय, व अमिनदिवी बेटे.
⇒ सन १९९२ ला दिल्लीचे नाव —— राष्ट्रीय राजधानी दिल्ली - NCR Delhi.
→ सन २००६ - पॉंडिचेरीचे नाव —— पुदुच्चेरी करण्यात आले.

वेगवेगळ्या कारणासाठी या प्रदेशांची निर्मिती.

१) राजकीय व प्रशासकीय हेतू — दिल्ली व चंडीगड
२) सांस्कृतिक वेगळेपण — पुदुच्चेरी, दादरा नगर हवेली, दमण आणि दिव.
३) सामरिक महत्व — अंदमान निकोबार, लक्षद्विप.
४) मागास व आदिवासी लोकांचे हितसंरक्षण - मिझोराम/मणीपूर/त्रिपुरा/अरुणाचल - नंतर राज्याचा दर्जा.

## संघराज्य प्रदेशाचे प्रशासन.

⟹ भाग ८ मधील २३९ ते २४१ कलमे.
⟹ संघराज्य प्रदेश- प्रकार एकच पण प्रशासकीय व्यवस्था भिन्न.
⟹ प्रत्येक संघराज्याचे प्रशासन राष्ट्रपतीकडून - त्याने नियुक्त केलेल्या प्रशासकामार्फत.
प्रशासक हा राष्ट्रपती प्रतिनिधी असतो राज्यपालाप्रमाणे राज्यप्रमुख नसतो.
राष्ट्रपती त्याचे पदनाम ठरवू शकतो उदा. नायब राज्यपाल/मुख्य आयुक्त/प्रशासक.
सध्या दिल्ली, पुदुच्चेरी, अंदमान निकोबार ⟶ नायब राज्यपाल
चंडीगड, दादरा हवेली, दमणदिव लक्षद्विप ⟶ प्रशासक

→ राष्ट्रपती लगतच्या राज्याच्या राज्यपालांनी संघराज्य प्रदेशासाठी प्रशासक म्हणून नेमू शकतो.
पंजाबच्या राज्यपाल चंडीगडचा प्रशासक व दादरा हवेलीचा प्रशासक दमन व दीवचा प्रशासक

→ पुदुच्चेरी (१९६३) व दिल्ली (१९९२) — विधानसभा.
विधानसभा असली तरी राष्ट्रपती व संसद यांचे नियंत्रण कमी होत नाही.

→ संघराज्य प्रदेशासाठी संसद तिन्ही सूचींमधील (राज्यसूचीसह) कोणत्याही विषयावर कायदे करू शकते. (दिल्ली व पुदुच्चेरी संदर्भात देखील)

→ पुदुच्चेरी व दिल्ली ची विधानसभा राज्यसूची व समवर्ती सूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करू शकते. (
दिल्लीच्या बाबतीत सार्व. सुव्यवस्था, पोलीस व भूमी हे विषय वगळून)

→ अंदमान निकोबार, लक्षद्वीप, दादरा नगर हवेली, दमण दिव यांच्या सुशासनासाठी राष्ट्रपती नियम करू शकतो. संसदेचे कायदे बदलू शकतो किंवा रद्द करू शकतो.
(पुदुच्चेरी विधानसभा विसर्जित किंवा निलंबित असेल तर फक्त त्याच काळात नियम करून राष्ट्रपती कायदे करू शकतो)

→ या प्रदेशांसाठी राष्ट्रपती उच्च न्यायालय स्थापन करू शकतो किंवा लगतच्या राज्याच्या उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राखाली आणू शकतो.
(फक्त दिल्लीसाठी स्वतंत्र उच्च न्यायालय → १९६६ पासून.

## * दिल्ली संदर्भात विशेष तरतुदी *

६९ वी १९९१ — पासून - विशेष दर्जा ⇒ दिल्लीचा राष्ट्रीय राजधानी प्र. - १ फेब्रु १९९२ लागू.
घ. दु. प्रशासक → नायब राज्यपाल.
या दुरुस्तीनुसार - विधानसभा व मंत्रिमंडळाची निर्मिती. (त्यापूर्वी महानगर परिषद व कार्यकारी परिषद)

⇒ विधानसभा सदस्य संख्या - ७० — प्रत्यक्ष निवडणूक - केंद्रिय निवडणूक आयोग.
→ मंत्रिमंडळ - १०% म्हणजे - ७ मंत्री (मुख्यमंत्री + ६)
→ राष्ट्रपती - मुख्यमंत्र्याची नियुक्ती करतात. (राज्यपाल नव्हे)
→ त्यांच्या सल्ल्याने राष्ट्रपती इतर मंत्र्यांची नियुक्ती करतो
→ मुख्यमंत्री व नायब राज्यपाल व मंत्री → मतभेद झाल्यास - राष्ट्रपतींकडे विषय.
⇒ घटनात्मक यंत्रणा अपयशी झाल्यास - राष्ट्रपती राजवट ३५६ नं लागू होऊ शकते.
(राज्यपालांच्या सल्ल्याने किंवा अन्यथाही)

→ विधानसभा अधिवेशन चालू नसताना नायब राज्यपालांना वटहुकूम काढण्याचा अधिकार.
या वटहुकूमाला विधानसभेच्या कायद्याइतके महत्त्व - अधिवेशन संपत केल्यावर संमत करणे
विधानसभा विसर्जित किंवा बरखास्त असल्यास वटहुकूम काढू शकत नाही.
राज्यपाल राष्ट्रपतींच्या पूर्व परवानगी शिवाय वटहुकूम काढू शकत नाही किंवा रद्द करू शकत नाही

## * संघराज्य प्रदेशांसाठी सल्लागार समित्या *

भारत सरकार नियम १९६१ नुसार - या प्रदेशांशी संबंधित कायदे व वित्त व अर्थसंकल्प, नायब राज्यपाल व प्रशासक यांची नियुक्ती व सेवा — यांचे नियंत्रण - गृह मंत्रालय.

Scanned by CamScanner

⇒ विधीमंडळ नसलेल्या ५ प्रदेशांसाठी गृहमंत्र्याची सल्लागार समिती हे व्यासपीठ आहे.

यामध्ये ① प्रशासक

② संबंधीत प्रदेशातील खासदार सदस्य.

③ जिल्हा पंचायत / नगर परिषद → नामनिर्देशित सदस्य.

बैठकीच्या अध्यक्षपदी → गृहमंत्री.

अनुपस्थीत → गृहमंत्रालयाचा राज्यमंत्री.

समिती → सामा. व आर्थिक विकासाच्या मुद्यावर चर्चा करते.

<u>कलमे</u> :

२३९ → सं.प्र. प्रशासन.

२३९ए → काही सं.प्रदेशात विधीमंडळ / मंत्रीमंडळ

२३९ एए → दिल्ली संदर्भात तरतुदी.

२३९ एबी → घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास तरतूद

२३९ बी → वटहुकूम संदर्भात.

२४१ - संघराज्य प्र. उच्च न्यायालये.

२४२ - कुर्ग (वगळले)